## निशाणी क्रमांक १४० खालील आदेश.

**१.** प्रतिवादी क्र. १/अ ते १/ क आणि २ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे त्यांच्या लैखी कैफियतीत दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे.

**२.** प्रतिवादींचे थोडक्यात कथन की, दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.१ आणि ६ मयत झालेले आहेत. वादींनी प्रस्तुतचा दावा अग्रहक्कावरुन खरेदीखत पुर्ण होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला असुन त्यांचे गट क्र. १५८६ मधील मिळकतीची कुळ कायद्याने बापु खांडेकराच्या तीन मुलांनी खरेदी केल्यानंतर त्यांच्यामध्ये सरस – निरस मानाने वाटप झालेले नसल्याचे कथन केलेले आहे. प्रतिवादींनी त्यांच्या लेखी कैफीयती मधून वादींचा दावा नाकारताना प्रतिवादींनी त्यांच्यामध्ये केलेल्या खरेदीपत्रांचे समर्थन केलेले असुन केवळ गट क्र. १५८६ चे मुळ मालक दड्डीकर असल्याचे कथन केलेले असुन वादींची इतर सर्व कथने नाकारलेली आहेत. दावा मिळकतीची पांडुरंग, वादी क्र.१ व २ आणि शंकर तोरस्कर हे कुळ कायद्याने मालक झाल्यानंतर त्यांनी आपसंमतीने सदर जमीनीचे वाटप करुन घेतलेले आहे. परंतु, सदर प्रतिवादींनी वाटपाच्या क्षेत्राबाबतची लेखी कैफीयतीत माहीती दिलेली असली तरी बापू कृष्णा खांडेकर यांच्या मुलांमध्ये कधी व कसे आणि कोणकोणत्या मिळकतींचे वाटप झाले याबाबतचा स्पष्ट तपशील दिलेला नाही.

**३.** प्रतिवादींचे पुढे कथन की, तसेच सदर मिळकतीशी शंकर तोरस्कर याचा कसा संबंध आला याबाबतचा मजकुर गडबडीत लिहिण्याचे राहुन गेलेले असुन त्यांनी सदर दावा केवळ चालण्यास पात्र नसल्याबाबतचा मजकुर लिहलेला आहे. तरी वादींना कोणत्या कारणाने हक्क येत नाही याबाबतचा स्पष्ट मजकुर लिहिणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सदर दाव्यातील प्रतिवादींतर्फे प्रथम नियुक्त करण्यात आलेल्या विधीज्ञां

मार्फत सदर मजकुर मनाईच्या कारणाने गडबडीत लिहायचे राहुन गेलेले आहे. प्रतिवादींची दरम्यानच्या कोरोना काळामध्ये भेट झालेली नसुन प्रतिवादी क्र.४ हा मुंबई येथे नोकरीस असुन प्रतिवादी क्र. ३ ते ६ च्या घराण्याचा कारभार पाहणारा प्रतिवादी क्र.३ हा सासरवाडीला राहत असल्यामुळे त्यांच्यामधील अन्य मिळकतींच्या वाटण्यांबाबतची माहिती नमुद करायचे राहून गेलेले आहे. तरी दाव्याचे गुणदोषावरती अंतिमतः निराकरण होण्यासाठी अर्जातील दुरुस्ती कलम अ आणि ब प्रमाणे लेखी कैफीयतीमध्ये दुरुस्ती आवश्यक आहे. सदर दुरुस्ती स्पष्टीकरण स्वरुपातील असुन प्रतिवादींच्या मुळ कैफीयतीच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच सदर दुरुस्ती नाकारल्यास त्यांना पुरावा सादर करण्यात तांत्रीक अडचणी निर्माण होणार आहेत. प्रतिवादींनी अद्याप पर्यंत त्यांचा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादींनी नि.क्र.१४४ प्रमाणे लेखी म्हणणे सादर करुन प्रतिवादींच्या अर्जास आक्षेप घेऊन सदर अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नसल्यामुळे रद्द करण्याची विनंती केली आहे. वादींचे कथन की, प्रतिवादींनी दि.१६.०१.२०१० रोजी त्यांची लेखी कैफीयत सादर केलेली आहे. तद्नंतर न्यायालयाने सुनिश्चीत केलेल्या वाद मुद्यांप्रमाणे वादींनी त्यांचा पुरावा पुर्ण केलेला आहे. प्रतिवादींच्या पुर्वाश्रमीच्या वकीलांनी पुरावा देण्याकामी ब–याच मुदती घेतल्यानंतर दुर्दैवाने त्यांच्या प्रकृतीस्वास्थ्यामुळे प्रतिवादींनी नवीन विधीज्ञांची नियुक्ती केलेली आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला असुन विलंबाबाबतचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. प्रतिवादींनी सदर मजकुर यापुर्वी त्यांच्या लेखी कैफीयतीमध्ये समाविष्ट करण्यास कोणती अडचण होती याबाबतचे कारण दिलेले नाही.

**५.** वादींचे पुढे कथन की, प्रतिवादींनी सदरचा अर्ज सादर करण्यास कोणतीही तत्परता दर्शवलेली नसल्यामुळे देखील त्यांचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. प्रतिवादी हे सदरच्या प्रस्तावीत दुरुस्तीद्वारे पुर्वी मान्य केलेल्या बाबी काढुन टाकु इच्छीत असुन मागणी केलेली दुरुस्ती कायदेशीर तत्वास सोडुन आहेत. तसेच वादींचा

पुरावा पुर्ण झाल्यानंतर त्यांच्या हक्कास बाधा निर्माण होईल अशा स्वरुपाची दुरुस्ती मान्य करता येऊ शकत नसल्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**६.** वादी आणि प्रतिवादींच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, त्यांनी त्यांच्या अर्जातील आणि लेखी जबाबातील कथनांप्रमाणे युक्तीवाद सादर केला आहे. प्रतिवादींच्या वकीलांनी अर्जातील प्रस्तावीत दुरुस्ती केवळ स्पष्टीकरण स्वरुपातील असल्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी प्रतिवादींनी सदर अर्जास झालेल्या विलंबाबतचे समाधान कारक स्पष्टीकरण दिलेले आहे. तसेच सदर प्रतिवादींनी पुर्वी नियुक्त केलेल्या विधीज्ञांच्या नजर चुकीने सदर बाब नमुद करायचे राहुन गेलेले असुन सदर दुरुस्तीद्वारे प्रतिवादी पुर्वी मान्य केलेली कोणतीही बाब नाकारत नसल्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पृष्ठतेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या चक्रेश्वरी कन्सट्रक्शन प्रा. लि. वि. मनोहर लाल (२०१७ (५) महा.लॉ.ज. १९५) आणि मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या कमलेश सुर्यवंशी आणि इतर वि. कल्याण कुमारदत्ता आणि इतर (२०१३ (६) महा.लॉ.ज. १९३), पाएदाद फर्नांडीस वि. चार्लेनो लेईटो (२०१२ (१) महा.लॉ.ज. ३१), हसीनाबी अब्दुल लतीफ वि. मोहम्मद शरीफ आणि इतर (२०२४ (४) महा.लॉ.ज. १२९) या न्यायनिर्णयांचा संदर्भ दिला आहे. मा. न्यायलयांनी वरील न्यायनिवाड्यांमध्ये प्रस्तावीत दुरुस्तीस मुदतीची बाधा येत नसुन आवश्यक आणि स्पष्टीकरणाच्या स्वरुपातील असल्यास केवळ विलंबाने मागणी केल्याच्या कारणा वरुन अमान्य करणे न्यायोचित नसुन झालेला विलंब दंडावरती मंजुर करणे उचित असल्याचे निष्कर्ष नोंदवलेले आहेत.

**७.** वादींच्या वकीलांनी प्रतिवादींनी मागीतलेल्या दुरुस्तीसाठी झालेल्या विलंबा बाबतचे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. वादींचा पुरावा पुर्ण झालेला असुन सध्या दावा हा प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबीत आहे. प्रतिवादींची मागनी दि.प्र.संहिता आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी प्रमाणे मान्य करता येण्यासारखी नाही. प्रतिवादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आलेले नसुन मागणी केलेली दुरुस्ती पुर्वी पासुन

त्यांच्या माहितीतील होती. तरी देखील प्रस्तुत अर्ज दाखल करेपर्यंत त्याबाबत दुरुस्ती मागितलेली नाही. सबब, प्रतिवादींना झालेल्या विलंबाचा आणि विलंबा बाबत स्पष्टीकरण दिलेले नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

८. त्यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पृष्ठतेसाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अजेंद्र प्रसादजी पांडे आणि इतर वि. केशव प्रकाशदासजी आणि इतर (ए आय आर २००७ सर्वोच्च न्यायालय ८०६) आणि मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या रामनाथ शंकर शिंदे वि. नारायण पांडुरंग शिंदे व इतर (ए आय आर २०१९ मुंबई ९४५), संपत अण्णा पाटील वि. शिवाजीराव पाटील मयत तर्फे वारस (ए आय आर ऑन लाईन २०१९ मुंबई ३१०२) आणि प्रभाकर गोखले वि. रमेश लडकत आणि इतर (२०१७ (६) ए बी आर ११७) या न्यायनिर्णयांचा संदर्भ दिला आहे.

**९.** मा. न्यायालयाने वरील अजेंद्र प्रसाद या न्यायनिर्णयात प्रतिवादींनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांना झालेल्या विलंबाबाबतचा कोणताही उल्लेख केलेला नसुन स्पष्टीकरण दिलेले नसल्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र असल्याचा निष्कर्ष नोंदवला आहे. तर रामनाथ आणि संपत या न्यायनिर्णयात प्रतिवादी दुरुस्तीद्वारे त्यांचा बचाव बदलू पाहत असुन पुर्वी मान्य केलेल्या बाबी नाकारत असल्यामुळे अर्ज नामंजुर करणे योग्य असल्याचा निष्कर्ष दिला आहे.

**१०.** प्रतिवादींनी प्रस्तुत दुरुस्ती अर्जाद्वारे दावा मिळकतींशी सबंधित असलेल्या वाटपा बाबतच्या स्पष्टीकरणाचा मजकुर समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. वादींतर्फे सदर बाब नाकारण्यात आलेली नसुन केवळ प्रस्तुतचा अर्ज विलंबाने आणि कोणत्याही संयुक्तीक कारणा शिवाय दाखल करण्यात आल्याबाबतचा आक्षेप घेण्यात आलेला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाद्वारे झालेल्या विलंबाबाबतचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी त्यांच्या पुर्वीच्या विधीज्ञां कडुन सदर बाब गडबडीत राहुन गेल्याचे कारण नमुद केलेले आहे. प्रतिवादींचे पुर्व विधीज्ञ त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे काम पाहु शकत नसल्याचे वादींनी विवादीत केलेले नाही.

**११.** प्रतिवादींनी मागणी केलेल्या दुरुस्तीसाठी झालेल्या विलंबा बाबत कारण दिलेले आहे. सदर दुरुस्तीद्वारे त्यांच्या बचावात कोणत्याही प्रकारचा बदल होत नसुन त्यांच्याद्वारे कोणत्याही मान्य केलेल्या बाबी नाकारलेल्या नाहीत. त्याच बरोबर प्रतिवादींनी अद्याप पर्यंत त्यांचा पुरावा सादर केलेला नाही. निश्चीतच जरी वाद मुद्यांच्या निश्चीती नंतर खटल्यास सुरवात होत असली तरी न्यायालय दाव्याच्या गुणदोषांवरील अंतिम आदेशासाठी आवश्यकता असल्यास दुरुस्तीचे अर्ज मंजुर करु शकते. त्यामुळे केवळ विलंबाच्या कारणा वरुन प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित ठरत नाही. प्रतिवादींची मागणी विचारात घेता त्यांनी दाखल केलेले वरील न्यायनिवाडे त्यांना पुर्णपणे उपयुक्त ठरत आहेत.

**१२.** प्रतिवादींची त्यांच्या बचावाच्या स्पष्टीकरणाच्या स्वरुपातील मागणी पाहता प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याच बरोबर वादींनी प्रतिवादी सदर दुरुस्तीद्वारे पुर्वी मान्य केलेली कोणती बाब नाकारत आहेत याबाबतचे अथवा सदर अर्ज मंजुर झाल्यामुळे त्यांचे कशा प्रकारे नुकसान होत आहे याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींची मागणी आणि दाव्याची सद्यस्थिती पाहता, वादींनी दाखल केलेले वरील न्यायनिवाडे फारसे उपयुक्त ठरत नाहीत. प्रतिवादींनी मागितलेली दावा दुरुस्तीची मागणी योग्य आहे किंवा नाही ही बाब अंतिम पुराव्या नंतर सिध्द होईल. न्यायालयाने सदर बाब दुरुस्ती अर्ज मंजूर करताना विचारात घेण्याची आवश्यकता नाही. तसेच लेखी कैफियतीच्या दुरुस्तीचे अर्ज दाव्यातील दुरुस्तीच्या निकषाप्रमाणे पडताळण्याची आवश्यकता नाही.

**१३.** प्रतिवादींनी दाखल केलेल्या वरील कमलेश या न्यायनिवाड्यात दुरुस्ती अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब आणि निष्काळजीपणा दंडावरती क्षमीत करता येत असल्यामुळे त्यांची मागणी पुर्णपणे नाकारणे न्यायोचित नसल्याचा निष्कर्ष नोंदवला आहे. प्रतिवादींनी केलेली मागणी विचारात घेता त्यांच्या मूळ लेखी कैफियतीमध्ये कोणताही बदल होत नाही. प्रतिवादींचा अर्ज मंजूर केल्यामुळे वादींना कोणतीही

अडचण निर्माण होणार नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयासह कायदेशीर गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होऊ शकते. सबब,न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## <u>आदेश</u>

१. अर्ज २,०००/– रुपयांच्या दंडावरती मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी दंडाची रक्कम वादीला दिल्यानंतर नियमाप्रमाणे १४ दिवसांमध्ये अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन सुधारीत प्रत दाखल करावी.

३. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन दावा निकाली काढण्यास प्राधान्य द्यावे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

(न्या. अ. सां. क्र. ०२८९७)

दिनांक – १५.११.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.